# कौटुंबिक न्यायालय, बेलपूर, नवी मुंबई.

दिनांक – ०४/०२/२०२५

## निविदा सुचना

कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई या न्यायालयाच्या अस्थापनेसाठी Canon Multifunctions machines Mfm , On site OEM Warranty 2 year canon हे नवीन झेरॉक्स मशिन स्टॅबीलायझर व मशिन ट्रॉलीसह खाली नमूद केलेल्या Specifications सह खरेदी करण्यासाठी कार्यालयीन अटी व शर्तीस अनुसरून स्थानिक अधिकृत विक्रेत्यांकडून मोहरबंद स्वरूपात निविदा मागविण्यात येत आहेत.

तरी इच्छूक विक्रेत्यांनी दिनांक ११/०२/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई यांच्या नावे निम्नलिखित पत्त्यावर मोहरबंद लखोटयात दरसुचीसह निवीदा/दरपत्रक सादर कराव्यात. उपरोक्त तारखेनंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकृत करण्याचा अथवा रदद् करण्याचा अधिकार सर्वस्वी मा. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई यांचा राहील.

पत्ता – कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई.
६ वा मजला, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय बिल्डींग
प्लॉट नंबर २०, २१, २२ सेक्टर-१५,
सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई.

सोबत कार्यालयीन माहीती अटी व शर्ती जोडण्यात आली आहे. सदर बाबत अधिक माहिती घेण्यासाठी सहाय्यक अधीक्षक, रोख व वित्त विभाग, कौटुंबिक न्यायालय, बेलापूर, नवी मुंबई यांच्याकडे कामाच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

हुकूमावरून,
04.2.2025
प्रबंधक,
कौटुंबिक न्यायालय, बेलापूर,
नवी मुंबई.

कौटुंबिक न्यायालय
बेलापूर

बेलापूर
दि. ०४/०२/२०२५

# Specifications

| Sr. No. | Min. Specifications |
|---|---|
| 1. | Print Speed Up to 25 ppm A4 Black |
| 2. | A3 monochrome laser jet printer |
| 3. | Duplex Printing |
| 4. | Network /USB |
| 5 | 2 tray &- A-3, A-4, Legal |
| 6. | 1 bypass tray |
| 7 | Trolley |
| 8 | Stabilizer |
| 9 | Storage 1 TB |
| 10 | Cassette Feeder |
| 11 | Ps/PCL |
| 12. | With 2 years on site OEM Warranty |

कौटुंबिक न्यायालय, बेलापूर.
दिनांक - ०४/०२/२०२५.

## अटी व शर्ती

१. ज्या निविदाकारांच्या निवीदा स्विकारण्यात येतील त्यांना सदर कामाचे आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आत निविदेप्रमाणे वस्तू पुरविणे बंधकारक राहील.

२. निवीदाकारांनी निवीदा सादर करताना प्रपत्र -१ सोबत खालिल कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

अ कंपनी / संस्थेची नोंदणीची छायांकीत प्रत

ब मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्रे

क कंपनी अथवा संस्था प्रमुखाचे पॅनकार्डची साक्षांकीत प्रत.

ड जी.एस.टी. कर नोंदणी प्रमाणपत्र

इ आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत.

ई अनुभव प्रमाणपत्र किंवा तत्सम कागदपत्र

फ निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र

ग कंपनी / संस्थेचे बचत अथवा चालू बॅंक खातेचे कागदपत्रे

ख निविदाकाराचे स्वत:वर कोणताही गुन्हा तसेच न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

३. निविदाकार यांना खरेदी केलेल्या झेरॉक्स मशिनच्या वॉरंटी कालावधीमध्ये दुरूस्तीकामी स्वखर्चाने सेवा उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

४. खरेदी केलेल्या झेरॉक्स मशिनच्या वॉरंटी कालावधीमध्ये नादुरूस्त सुटे भाग बदलणेकामी अतिरिक्त सेवा शुल्क देण्यात येणार नाही तसेच प्रिन्टर दुरूस्तीबाबत सेवा कौटुंबिक न्यायालय, बेलापूर नवी मुंबई येथील कार्यालयामध्येच देणे बंधनकारक असेल झेरॉक्स मशिन दुरूस्तीकामी न्यायालयाबाहेर घेवून जाता येणार नाही.

५. निविदाकाराची निविदा स्विकृत झाल्यानंतर झेरॉक्स मशिन खरेदीचे कंत्राट कोणत्याही परिस्थितीत इतरांना हस्तांतरीत करता येणार नाही.

६. मंजूर झालेल्या निविदाकारा कडून झेरॉक्स मशिन खरेदी केल्यानंतर त्यांची विनामुल्य जोडणी करून देणे निविदाकारास बंधनकारक राहील. तसेच झेरॉक्स माशिनच्या

जोडणीच्या वेळी कामगारांकडून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याचे आढळल्यास सदरची नुकसान भरपाई निवादाकाराकडून करण्यात येईल.

७. या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करणे निविदाकार यांच्यावर बंधनकारक राहील.

हुकूमावरून

04.2.2025

प्रबंधक

कौटुंबिक न्यायालय, बेलापूर

नवी मुंबई.

बेलापूर.

दिनांक -०४/०२/२०२५